दैनिक

अचूक वेध, अचूक बातमी

# अक्षराज

संपूर्ण महाराष्ट्रातून एकाच वेळी प्रसिद्ध

वर्ष : ०४, अंक : १६९
पाने : ०४, किंमत : ०३ रुपये
संपादक : विनोद कैलास गोरे
RNI NO. : MAHMAR/2022/82056
Follow Us On : www.aksharaj.com
Email : newsaksharaj2021@gmail.com

बुलडाणा, गुरुवार, दि.३० जानेवारी २०२५





## सपोनि ज्ञानेश्वर शिंदे यांची अवैध धंद्याविरुद्ध बेधडक कारवाई



**अक्षराज : दत्ता हमंद**

**दि.२९, कुंडलवाडी :** कुंडलवाडी पोलीस ठाण्याच्या हद्दीत कुंडलवाडी ते पिंपळगाव जाणाऱ्या रस्त्यावर अवैध दारू वाहतूक होत असल्याची गुप्त माहिती मिळाल्यावर कुंडलवाडी पोलीस ठाण्याचे सहायक पोलीस निरीक्षक ज्ञानेश्वर शिंदे व इतर सहकाऱ्यांनी ६ हजार ७२० रुपयांची दारू व ७० हजार रुपये किमतीची मोटरसायकल असा ७६ हजार ७२० रुपयांचा मुद्देमाल जप्त करून कुंडलवाडी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. ही कारवाई २८ जानेवारी रोजी रात्री ९:३० वाजेच्या सुमारास करण्यात आली आहे. कुंडलवाडी ते पिंपळगाव जाणाऱ्या रस्त्यावर दि.२८ जानेवारी रोजी रात्री ९:३० वाजेच्या सुमारास अवैध दारू वाहतूक होत असल्याची गुप्त माहिती कुंडलवाडी पोलिसांना मिळाली. यावरून कुंडलवाडी पोलीस ठाण्याचे सहायक पोलीस निरीक्षक ज्ञानेश्वर शिंदे, पोहेकॉं शंकर चव्हाण, पोहेकॉं अरुणा श्रीवास्तव व रवि देशमुख यांनी पिंपळगाव रस्त्यावर मोटरसायकल क्र. एम एच २६ सी एस ०३९८ या क्रमांकाच्या मोटरसायकल वरून अवैध दारू वाहतूक करीत असताना राजशेखर गोपाल गौड निम्माला यास पकडले. असून त्याच्याकडून ६ हजार ७२०, रुपये किमतीची देशी दारू भिंगरी संत्राचे ९६ बॉटल व ७०-हजार रुपये किमतीची मोटरसायकल असा एकूण ७६ हजार ७२० रुपयांचा मुद्देमाल जप्त करून आरोपी राजशेखर गोपाल गौड निम्मला याच्याविरुद्ध कुंडलवाडी पोलीस ठाण्यात गुरनं ९/२०२५ कलम ६५ ई दारूबंदी कायद्याने गुन्हा दाखल करण्यात आला असून या प्रकरणाचा पुढील तपास सहायक पोलीस निरीक्षक ज्ञानेश्वर शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली पोहेकॉं शंकर चव्हाण हे करीत आहेत.

## ७१ लाखांचे अवैध बायोडिझेल टँकरसह जप्त



**अक्षराज : वृत्तसंकलन**

**दि.२९, बुलडाणा :** स्थानिक महसूल यंत्रणा कुंभकर्णी झोपेत असताना अथवा सोयीस्कर दुर्लक्ष करीत असताना मुंबई येथील दक्षता पथकाने बुलढाणा जिल्ह्यातील मलकापूर परिसरात महाकारवाई केली. मुंबई नागपूर राष्ट्रीय महाम ार्ग ५३ वरील कारवाईपूर्वी मलकापूर येथे तळ ठोकून असलेल्या या पथकाने तब्बल ७१ लाख रुपये किंमतीचे अवैध बायोडिझेल, इंधन वाहक टँकर यासह अवैध विक्री केंद्राचे साहित्य जप्त केले आहे. या कारवाईबाबत काटेकोर गुप्तता बाळगण्यात आल्याने मलकापूर येथील महसूल यंत्रणांनादेखील याची कानोकानी खबर लागू देण्यात आली नाही. या कारवाईमुळे मलकापूर महसूल यंत्रणा संशयाच्या भोवऱ्यात सापडली असून जिल्हाधिकारी किरण पाटील याप्रकरणी काय कारवाई करतात याकडे महसूल यंत्रणेसह जिल्ह्याच्या प्रशासकीय वर्तुळाचे लक्ष लागले आहे.

मलकापूर नजीकच्या मुंबई नागपूर राष्ट्रीय महामार्ग (५३) वर दोन ठिकाणी राजरोसपणे सुरू असलेल्या अवैध पंपावर ही अठ्ठावीस जानेवारीच्या उत्तररात्रीपर्यंत कारवाई करण्यात आली. यानंतर चौदा आरोपीविरुद्ध गुन्हे दाखल करण्यात आले. महामार्गावरील तालसवाडा बस थांबा आणि हॉटेल एकताजवळ अशा दोन ठिकाणी हा गोरखधंदा सुरू होता.

मलकापूर एमआयडीसी पोलीस ठाण्यात प्रकरणी दोन स्वतंत्र गुन्हे दाखल करण्यात आले आहे. एका घटनेत ३४.६१ लाख तर दुसऱ्या घटनेत ३६.२८ लक्ष रुपयांचे अवैध बायोडिझेल, वाहने, पंपावरील साहित्य असा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. तसेच दोन टँकरमधून जमिनीखाली तयार करण्यात आलेल्या टाकीत शेकडो लिटर इंधन खाली करताना रंगेहात पकडण्यात आले.

याप्रकरणी पोलिसांनी कलम ३,७,८ जीवनावश्यक वस्तू अधिनियम १९५५, 'मोटार स्पिरीट अ‍ॅण्ड हाय रिपेड डिझेल सदृश्य पेट्रोलियम द्रव पदार्थ (रेगुलेशन ऑफ सप्लाय डिस्ट्रीब्युशन अ‍ॅण्ड प्रिव्हेन्शन ऑफ माल प्रक्टिसेस) २००५ मधील कलम २ (ए), २ (ई), २ (एफ), २ (जी), २ (टी) ३ (५) नुसार गुन्हे दाखल करण्यात आले आहे.

नायब तहसीलदार श्रीकृष्ण साहेबराव उगले मलकापूर तर दुसऱ्या प्रकरणात पुरवठा निरीक्षण अधिकारी धनवर्षा हरणे यांनी तक्रार दिली. यावरून पोलिसांनी मालक नसिम शाहील, रइस जमदार लखन बद्रीनाथ पांचाळ, इम्रान खान काम गार, राम सागर, खाजा सोहिल, असलम खान, समीर खान आदीविरुद्ध गुन्हे दाखल करण्यात आले आहे. यात मालक, टँकर चालक, पंप कर्मचारी यांचा समावेश आहे. मोठ्या प्रमाणावरील बायोडिझेल विक्रीकेंद्र (पंप) मधील जमिनीत गाडलेल्या टाकीत खाली करताना यांना रंगेहात पकडण्यात आले.

**काटेकोर गुप्तता...**

मुंबई येथील दक्षता पथकाने मलकापूर परिसरात मुक्काम ठोकून अवैध विक्री केंद्र, आरोपीची कार्य पद्धती, हालचाली यावर पाळत ठेवली. यानंतर टँकर आले असताना दोन्ही ठिकाणी छापा टाकीत धडक कारवाई केली. स्थानिक महसूल अधिकारी, कर्मचारी यांनाही याची पूर्व कल्पना नव्हती. महाकारवाई सुरु असताना ते घटनास्थळी दाखल झाले.

# महाकुंभमेळ्यात चेंगराचेंगरी, 30 भाविकांचा मृत्यू

**अक्षराज : वृत्तसंकलन**

**दि.२९, प्रयागराज :** मौनी अमावस्येनिमित्त पवित्र शाही स्नान करण्याच्या उद्देशाने जमलेल्या संगम घाटावर चेंगराचेंगरी झाली आहे. या चेंगारचेंगरीत ३० जणांचा मृत्यू झाला असून, २५ जणांची ओळख पटली आहे. जखमी रुग्णांना जवळच्या रुग्णालयात हलवण्यात आले असून त्यांच्यावर उपचार सुरू आहेत. दरम्यान, उत्तर प्रदेशचे मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ यांनी भाविकांना महत्त्वाचं आवाहन केलं आहे.




मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ म्हणाले, गंगा नदीच्या ज्या घाटाजवळ तुम्ही आहात तिथेच शाही स्नान करा. संगम घाटाजवळ येण्याचा प्रयत्न करू नका. प्रशासनाने दिलेल्या निर्देशांचं पालन करा आणि व्यवस्था टिकवून ठेवण्याकरता सहकार्य करा. तसंच, कोणत्याही अफवांवर विश्वास न ठेवण्याचेही आवाहन करण्यात आले आहे. घटनास्थळी रुग्णवाहिका दाखल करण्यात आल्या असून जखमींना कुंभच्या सेक्टर २ मधील तात्पुरत्या रुग्णालयात हलवण्यात आले आहे. चेंगराचेंगरीनंतर आजचे अमृत स्नान रद्द करण्यात आल्याचे आखाडा परिषदेने जाहीर केले. अधिकाऱ्यांनी भाविकांना संगमात स्नान केल्यानंतर जागा रिकामी करण्याचे आवाहन केले. तसंच, संगम घाटावर जाऊन स्नान न करण्याचे आवाहन करण्यात आले असून नजिकच्या इतर घाटावर जाऊन स्नान करण्याचे आवाहन करण्यात आले आहे. आम्ही दोन बसमध्ये ६० जणांच्या तुकडीत आलो. आम्ही नऊ जणांच्या ग्रुपमध्ये होतो. अचानक गर्दीत धक्काबुक्की झाली आणि आम्ही अडकलो. आमच्यापैकी बरेच जण खाली पडले आणि गर्दी अनियंत्रित झाली, कर्नाटकातील सरोजिनी यांनी पीटीआय या वृत्तसंस्थेला सांगितले.

**पंतप्रधान नरेंद्र मोदींनी साधला मुख्यमंत्र्यांशी संवाद**

दरम्यान, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी तत्काळ उत्तर प्रदेशचे मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ यांच्याशी संपर्क साधून म दतीचे आवाहन केले आहे. तर, केंद्रीय गृहमंत्री यांनीही योगी आदित्यनाथ यांच्याशी संवाद साधून परिस्थितीचा आढावा घेतला आहे.

गंगा, यमुना आणि सरस्वती नद्यांचा संगम असलेल्या त्रिवेणी संगम अत्यंत पवित्र मानला जातो. त्यामुळे महाकुंभ दरम्यान आणि मौनी अमावस्यासारख्या विशेष स्नानाच्या तारखांमध्ये स्नान करणं पवित्र मानलं जातं. स्नान करणाऱ्यांना मोक्ष प्राप्त होतो, असंही म्हणतात.

# महाराष्ट्राचा पदकाचा चौकार, मिहीर आम्बेची रूपेरी कामगिरी!

**अक्षराज : वृत्तसंकलन**

**दि.२९, उत्तराखंड :** उत्तराखंडात सुरू असलेल्या ३८व्या राष्ट्रीय क्रीडा स्पर्धेत महाराष्ट्राने आज पदकाची चौकर झळकविला. २ रौप्य व २ कास्य पदके जिंकून महाराष्ट्राने दिवस गाजविला. मि हीर आम्ब्रे यांनी रौप्य पदक पटकाविले. मुलींच्या रिले शर्यतीत महाराष्ट्राला रौप्य पदक तर आदिती हेगडे हिला एक कांस्यपदकाची कमाई केली. सोलापूरच्या ओम अवस्थी याने दहा मीटर प्लॅटफॉर्म डायव्हिंग प्रकारात कांस्यपदकाची कमाई केली.

हल्दवानीतील इंदिरा गांधी स्टेडियममध्ये जलतरण तलावावर पुण्याच्या मिहिर आम्ब्रेने पुरूषांच्या १०० मीटर बटरफ्लाय प्रकारात रौप्य पदकाचा करिश्मा घडविला. नाशिकच्या अदिती हेगडे हिने महिलांच्या २०० मीटर फ्री स्टाईल प्रकारात कांस्यपदकाची कमाई केली.मिहीर आम्ब्रे या महाराष्ट्राच्याच खेळाडूने १०० मीटर्स बटरफ्लाय क्रीडा प्रकारात रुपेरी यश संपादन केले. त्याला ही शर्यत पार करण्यासाठी ५४.२४ सेकंद वेळ लागला. मुलींच्या चार बाय शंभर मीटर फ्रीस्टाइल रिले शर्यतीत महाराष्ट्राला रौप्य पदक मिळाले. अवंतिका चव्हाण, अन्वी देशवाल, सान्वी देशवाल व अदिती हेगडे यांनी हे अंतर चार मिनिटे २.१७ सेकंदात पार केले.



महाराष्ट्राच्या आदिती हेगडे हिने २०० मीटर्स क्रीडा प्रकारात कांस्यपदकाची कमाई केली तिला हे अंतर पार करण्यास दोन मिनिटे ९.५३ सेकंद वेळ लागला कर्नाटकची देसिंधु धिनिधी (दोन मिनिटे ३.२४ सेकंद) व दिल्लीची भाव्या सचदेव (दोन मिनिटे ८.६८ सेकंद) यांनी अनुक्रमे सुवर्ण व रौप्य पदकाचा मान मिळविला. ओम अवस्थीने अप्रतिम कौशल्य दाखवीत दहा मीटर प्लॅटफॉर्म डायव्हिंग प्रकारात कांस्यपदकाची कमाई केली. यापूर्वीही त्याने राष्ट्रीय क्रीडा स्पर्धांमध्ये भरघोस पदके जिंकलेली आहेत. तसेच राज्यस्तरीय स्पर्धांमध्ये त्याने सातत्याने सुवर्णपदके जिंकली आहेत. ओमने रेल्वेकडूनही वेगवेगळ्या स्पर्धांमध्ये सहभागी होत अव्वल दर्जाची कामगिरी केलेली आहे. गतवर्षी, त्याने वरिष्ठ गटाच्या राष्ट्रीय स्पर्धेमध्ये सोनेरी कामगिरी केली होती.







## 'जीबीएस'चे थैमान !

राज्यात गुइनेल बँरे सिंड्रोमच्या (जीबीएस) रुग्णसंख्येत दिवसेंदिवस वाढ होत आहे. याची दखल केंद्र सरकारने घेतली आहे. महाराष्ट्रातील आरोग्याची ही समस्या हाताळण्यासाठी केंद्र सरकारने उच्चस्तरीय समिती नियुक्त केली आहे. राज्यात गुइलेन बँरे सिंड्रोमच्या (जीबीएस) रुग्णांची संख्या १०१ वर पोहोचली असून, त्यातील १६ रुग्ण व्हेंटिलेटरवर आहेत. पुण्यानंतर आता पश्चिम बंगालमध्येही जीबीएसने थैमान घातले आहे. जीबीएसमुळे १० आणि १७ वर्षीय अशा दोन मुलांचा मृत्यू झाला असल्याचे वृत्त द इंडियन एक्स्प्रेसने दिले आहे.

सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, १० वर्षीय मुलाला कोलकाता येथील रुग्णालयात उपचारासाठी दाखल करण्यात आले होते. उपचार सुरू असताना रविवारी त्याचा मृत्यू झाला. उत्तर २४ परगणा जिल्ह्यातील या मुलावर बीसी रॉय रुग्णालयात आठवडाभर उपचार सुरू होते. दरम्यान उत्तर २४ परगणा जिल्ह्यातील १७ वर्षीय मुलाचाही गुइलेन बँरे सिंड्रोममुळे मृत्यू झाल्याची माहिती समोर आली आहे. या मुलाला जीबीएसचे लक्षणे दाखवत होती. तसेच त्याच्यावर कोलकाता येथील एनआरएस वैद्यकीय महाविद्यालय आणि रुग्णालयात उपचार सुरू होते. रुग्णालयातील सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, अल्पवयीन मुलाचा जीबीएसच्या लक्षणांमुळे मृत्यू झाला असल्याची शक्यता आहे. पण मृत्यूच्या खऱ्या कारणाचा अद्याप शोध घेतला जात आहे.

तसेच आजत हुगळी येथील ४८ वर्षीय इसमाचाही गुइलेन बँरे सिंड्रोममुळे मृत्यू झाल्याचे कळत आहे. धनियाखली येथे राहणारा हा रुग्ण आजारी पडल्यानंतर स्थानिक डॉक्टरकडे गेला होता. त्याच्या लक्षणांची तपासणी केल्यानंतर त्याला तात्काळ कोलकाता येथे पुढील उपचारासाठी पाठविण्यात आले. या रुग्णाला मागच्या चार दिवसांपासून डायरिया झाला होता, तसेच त्याच्या कमरेखालच्या शरीराला अर्धांगवायूचा झटका आला होता. कोलकाता येथील रुग्णालयात नेत असतानाच त्याचा मृत्यू झाला. गुइलेन बँरे सिंड्रोम हा विकार योग्य उपचारानंतर पूर्णपणे बरा होतो. नागरिकांनी पिण्याचे पाणी उकळून प्यावे. याचबरोबर बाहेरील खाद्यपदार्थ खाणे टाळावे. या विकाराची कोणतीही लक्षणे आढळून आल्यास नागरिकांनी तातडीने डॉक्टरांचा सल्ला घ्यावा, असे न्यूरॉलॉजिकल सोसायटी ऑफ पुणे, या संस्थेचे अध्यक्ष डॉ. राहुल कुलकर्णी म्हणाले आहेत.

## 'पर्यावरण एक तास' खारघरमध्ये विविध स्पर्धांचे आयोजन

**अक्षराज : जे. के. पोळ**

**दि.२९, खारघर (पनवेल) :** माझी वसुंधरा अभियान ५.० अंतर्गत पर्यावरण संवर्धन व संरक्षण याचे महत्व शालेय, स्तरावर बाल वयात विद्यार्थ्यांमध्ये प्रत्यक्ष कृतीद्वारे बिंबवण्यासाठी माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळांमध्ये 'पर्यावरण तास' हा उपक्रम पनवेल महानगर पालिकेच्या वतीने राबविण्यात येत आहे. आयुक्त मंगेश चितळे यांच्या मार्गदर्शनाखाली दिनांक २८ फेब्रुवारी रोजी रामशेठ ठाकूर उच्च माध्यमिक विद्यालय खारघर येथे महापालिकेच्या वतीने 'चर्चासत्राचे' आयोजन करण्यात आले. माझी वसुंधरा अभियान ५.० अंतर्गत पर्यावरणाचे महत्व शालेय विद्यार्थ्यांना समजावे यासाठी पर्यावरण तास हा उपक्रम उपायुक्त डॉ.वैभव विधाते यांच्या सूचनेनुसार महापालिका कार्यक्षेत्रातील विद्यालयांमध्ये राबविण्यात येत आहे. या अंतर्गत आकाश, जल, वायू, भूमी, अग्नि या माझी वसुंधरा अभियानातील महत्वाच्या घटकांनुसार कृती कार्यक्रम, शिबिरे, व्याख्याने, वक्तृत्व स्पर्धा, पोस्टर स्पर्धा, वृक्षारोपण, प्रश्नमंजूषा, चर्चासत्र, विविध खेळांचे आयोजन विद्यालयांमध्ये करण्यात येत आहेत. रामशेठ ठाकूर उच्च माध्यमिक विद्यालय खारघर येथे महापालिकेच्यावतीने 'पर्यावरण तास' या उपक्रमांतर्गत झालेल्या चर्चासत्रामध्ये विद्यार्थ्यांनी उत्स्फुर्तपणे सहभाग घेतला.

# हिमालयाच्या कुशीतील देवभुमी - हरिद्वार ऋषीकेश

नेहमी प्रमाणेच मी आणि पत्नी अलका दोघांनी मनात आले भरली बॅग आणि गाडी पकडुन निघालो, देवदर्शनाला. यावेळेस प्रयागराज येथे कुंभमेळा असल्याने गर्दीत जाण्याचे टाळले अयोध्येला जाण्याची इच्छा होती मात्र निघालो देवभुमी हरिद्वार ऋषीकेश च्या भेटीला.निघतांनाच बांद्रा टर्मिनल मधे चांगलीच फजिती झाली असती, हरिद्वार - बांद्रा गाडी नुकतीच अकरा वाजता येऊन थांबली होती आम्हाला वाटले तीच गाडी परत जाणार असेल म्हणून मी जाऊन बसलो पाठीमागुन सौ. अलका येतच होती इतक्यात प्रवासी टिकिट चेक करणाऱ्या टीसी ला लक्षात आले आणि त्याने ही गाडी आलेली आहे जाणारी गाडी फलाट क्रमांक तीन वरून जाणार असल्याचे सांगितले मग घाईघाईत फलाट क्रमांक वरील गाडी गाठली अन्यथा देवभुमीची यात्रा मुंबईतच झाली असती.

दहा जानेवारीला बांद्रा येथुन रात्रीची मुंबई हरिद्वार एक्सप्रेस ने प्रवासाला सुरुवात झाली ३१ तासांच्या प्रवासानंतर हरिद्वार येथे सकाळी पोहोचला तेथे अगोदरच बँकेचे हॉलिडे होम बुक केलेले होते, सकाळी फ्रेश होऊन हरिद्वार फिरण्याचे ठरवले, हजार रुपये दिवसासाठी रिक्षा ठरवून हरिद्वार मधील मन्सादेवी, चंडादेवी, ईतर धार्मिक तसेच प्रेक्षणीय स्थळे पाहिली आणि संध्याकाळी हरिद्वार येथील मुख्य आकर्षण असलेल्या गंगा आरती साठी पोहचलो. गंगा आरती संध्याकाळी साडेपाच वाजता सुरू होते साधारणतः अर्धा तास गंगा आरती चालते मात्र यासाठी दररोज हजारो भाविक मनोभावे आरती पुजा करतात, दिवा गंगार्पण करतात, आपल्या सारख्या दुरवर राहणाऱ्यांसाठी हा अविस्मरणीय असाच अनुभव असतो. मन्सादेवी तसेच चंडादेवी मंदिरात जाण्यासाठी रोपवे तिकिट काढून जावे लागते साधारणपणे माणशी दोनशे रुपये तिकिट आहे.

हरिद्वार - ऋषीकेश एका दिवसात होऊ शकते आणि हरिद्वार येथून तीनशे रूपये माणसी ट्रॅव्हल्स मार्फत फिरता येते मात्र आम्ही हरिद्वार फिरण्यासाठी खाजगी वाहनाने हरिद्वार फिरलो आणि दुसऱ्या दिवशी बसने ऋषीकेश गाठले, भाडे सत्तर रुपये माणशी. ऋषीकेश मधे देखील खाजगी रिक्षा केली, साईटसिईंग साठी सातशे तीस रुपये प्रमाणे रिक्षा मिळतात. त्रिवेणी संगम घाट, लक्ष्मण झुला, राम झुला ही ऋषीकेश मधील मुख्य आकर्षण स्थळे आहेत ईतर मंदिरे देखील पहाण्यासारखी आहेत. मात्र ऋषीकेश पासुन पंचवीस तीस किलोमीटरवर निलकंठ महादेव मंदिर आहे ते अवश्य पहावे आणि तेथे जाण्यासाठी रामझुला येथून माणशी अडीचशे रूपये जाऊन येऊन या प्रमाणे जीप कार ने जाता येते,ते सर्व पाहुन आम्ही पुन्हा हरिद्वार येथे मुक्कामी आलो. तिसऱ्या दिवशी हरिद्वार येथून डेहराडून, मसुरी ट्रीप साठी ट्रॅव्हल्स बस जातात माणशी साडे चारशे रुपये तिकिट खर्च आहे. हरिद्वार डेहराडून ४५ किमी आणि तेथुन मसुरी तीस किलोमीटर अंतर आहे.

मात्र डेहराडून पासुन संपुर्ण घाटाचा रस्ता आहे. याच मार्गावर सहस्रधारा येथे अतिशय सुंदर पर्यटन स्थळ आहे वर डोंगरावर साई मंदिर आणि देवीचे मंदिर आहे मात्र येथे देखील रोपवे ने जावे लागते.




हरिद्वार ऋषीकेश येथुनच चार धाम यात्रेला सुरवात होते आणि बुकिंग देखील होते. डेहराडून मसुरी मार्गे गंगोत्री, यमनोत्री, केदारनाथ, बद्रिनाथ, ऋषीकेश अशी दहा बारा दिवसात चार धाम यात्रा केली जाते. मसुरी येथे शहरात मॉल रोड, कॅम्टी फॉल ही मुख्य आकर्षण आहेत. मसुरी येथुनच टिहरी गढवाल भाग सुरु होतो. डेहराडून ते मसुरी या मार्गावर प्रकाशेश्वर महादेव मंदिर अगदी रस्त्यावरच आहे तेथे महादेवाचे मंदिर आहे इथे आवर्जून उल्लेख केला पाहिजे तो म्हणजे हे एक खाजगी मंदिर आहे आणि वैशिष्ट्य म्हणजे इथे चक्क कुठलेही दान स्विकारले जात नाही कि कुठे दान पेटी ठेवलेली दिसत नाही याऊलट इथे कुठलेही दान करु नये वा पुजारी किंवा इतर कोणाला पैसे देऊ नये असे फलक लावण्यात आले आहे, ईतर देवस्थान वा धार्मिक स्थळे आणि हे मंदिर यातील फरक फारच बोलका आहे.

तीन दिवस हरिद्वार ऋषीकेश देवभुमीचे देव दर्शन झाल्यानंतर आम्ही दोघांनीही दिल्ली गाठली, डिसेंबर, जानेवारी या काळात उत्तर भारतात धुके मोठ्याप्रमाणावर असते आणि त्याचा परिणाम रेल्वे वाहतुकीवर होतो, अगदी समोरचे ही काही दिसत नाही त्यामुळे एरवी चार पाच तासांच्या प्रवासाला तब्बल आठ तास लागले, हजरत निझामुद्दीन रेल्वे स्थानकाजवळच हॉटेल बुक केले, दुसऱ्या दिवशी दिल्ली दर्शन ट्रॅव्हल्स मार्फत केले, जयपूर ला जाण्याचा विचार होता मात्र कडाक्याची थंडी आणि पावसाची शक्यता लक्षात घेऊन तसेच दिल्ली - जयपूर साईटसिईंग साठी एका दिवसात जाऊन येणे त्रासदायक असल्याने दिल्लि येथेच थांबलो, दुसऱ्या दिवशी दोनशे रुपये भरून मेट्रो चे एक दिवसाचे तिकिट घेतले, एका दिवसात कुठेही फिरता येते, मग अक्षरधाम, लाल किल्ला, जामा मशिद, चांदनी चौक या भागात फिरलो. आणि अठरा तारखेला मंगला एक्स्प्रेस ने परतीचा प्रवास करत घर गाठले. सर्व प्रवास मजेत आणि आनंदात झाला. हरिद्वार ऋषीकेश साठी मुंबई वरुन मध्य रेल्वे, पश्चिम रेल्वेवरून जाता येते, साधारणतः २६ ते तीस तासांचा प्रवास आहे. तर डेहराडून येथुन हेलिकॉप्टरने चारधाम यात्रा करता येते.

**- अनंत बोरसे**
**शहापूर जिल्हा ठाणे**
**९१५८४९५०३७**

# पाणीपुरवठा समस्यांवर आ.गावित यांची चर्चा, मंत्री पाटील यांचा जिल्हा दौरा लवकरच

**अक्षराज : निलेश कासट**

**दि.२९, पालघर :** पालघर जिल्ह्यातील विविध पाणीपुरवठा योजनांच्या स्थितीबाबत सविस्तर चर्चा करण्यासाठी महाराष्ट्र शासन मंत्रालय पाणीपुरवठा आणि स्वच्छता मंत्री गुलाबराव पाटील यांची १३० पालघर (अ.ज.) विधानसभा आमदार राजेंद्र गावित यांनी प्रत्यक्ष भेट घेतली.

या चर्चेदरम्यान, वाडा पोखरण २६ गावांची पाणी पुरवठा योजना, झांझरोळी केळवा माहिम प्रादेशिक पाणी पुरवठा योजना, सफाळे २६ गावांची नळ पाणी पुरवठा योजना, पालघर शहर व ग्रामीण पाणी पुरवठा योजना, महाराष्ट्र जल जीवन प्राधिकरण योजना, मोखाडा ५४ गावांची नळ पाणी पुरवठा योजना, वसई विरार शहर महानगरपालिका क्षेत्र सह ग्रामीण भागातील ६९ गावांची नळ पाणी पुरवठा योजना पालघर जिल्ह्यातील पाणीपुरवठ्याच्या प्रलंबित योजनांवर सविस्तर चर्चा करण्यात आली. तसेच, ग्रामीण भागातील पाण्याच्या उपलब्धतेची स्थिती, रखडलेल्या योजनांचे प्रश्न, तसेच भविष्यातील उपाययोजनांवर यावेळी भर देण्यात आला.

यावेळी मंत्री गुलाबराव पाटील यांनी समस्या



गांभीर्याने ऐकून घेतल्या असून, जिल्ह्यातील पाणीपुरवठा योजनांचा प्रत्यक्ष आढावा घेण्यासाठी लवकरच पालघर जिल्ह्याचा दौरा करणार असल्याचे आश्वासन दिले असल्याचे आ. गावित यांनी सांगितले.

तसेच आमदार राजेंद्र गावित यांनी जिल्ह्यातील आदिवासी व ग्रामीण भागातील नागरिकांना भेडसावणाऱ्या पाणीपुरवठा प्रश्नांवर तातडीने तोडगा काढण्याची विनंती केली. मंत्री पाटील यांनी संबंधित अधिकाऱ्यांना कार्यवाही करण्याचे निर्देश देणार असल्याचेही सांगितले.

मंत्री महोदयांच्या पालघर दौऱ्यात विविध प्रलंबित योजना, स्थानिकांच्या समस्या आणि प्रशासनाची भूमिका यांचा आढावा घेण्यात येणार असल्याची शक्यता आहे. त्यामुळे या दौऱ्याबाबत नागरिकांमध्ये मोठी उत्सुकता आहे.

## गांधीजी..

नोटे वरले गांधीजी
प्रिय वाटती सकला
खिशात भरता नोटा
माणूसजाई विकला

सत्यमेव जयते बोले
कितीकरांलं नकला
स्पष्ट दिसे हिंसकता
आरशां पहा शकला

गांधीविचार अवघड
अवजड का शृंखला
काल बाह्य समजतो
आचार ते विसृंखला

सेल्फी वुईथ चरखा
आव केवढा राखला
खादी घालून दाखवे
गांधीवादाचादाखला

जयंती न् पुण्यतिथी
कमरेतून तू वाकला
फक्त समारोहापुरता
मोद स्मित टिकला

नाव घेऊन बापूंजींचे
निवडणूका जिंकला
उपोषण उठसूठ करे
विरोध मार्ग आखला

राज घाटा नतमस्तक
सत्तेचास्वाद चाखला
नथु राम कसा टपला
रूतूनबसला चिखला

**- हेमंत मुसरीफ, पुणे**
**९७३०३०६९९६**

# करदाता - एक मध्यमवर्गीय

अहोरात्र काबाड कष्ट करून पोटाची खळगी भरण्यासाठी व कुटुंबाच्या गरजा पूर्ण करण्यासाठी मध्यमवर्गीय सतत झटत असतो. मध्यमवर्ग त्यांच्या छोट्या छोट्या व्यवसायातून व नोकऱ्यातूनच खऱ्या अर्थाने राष्ट्राच्या विकासासाठी हातभार लावत असतात. त्या काम ऱ्या माध्यमातून त्याला रोजगार मिळतो. पगार मिळतो. छोट्या-छोट्या व्यवसायातून त्याला नफा मिळतो व त्यातून तो त्याच्या गरजा भागवतो,मात्र करकुठे कुठे भरतो याचा विचार केलाय का? सकाळी उठले. दंतमंजन ब्रशचा वापर केला त्यावर कर, तोंड धुण्यासाठी पाणी वापरले त्यावर कर,चहा बनवण्यासाठी चहा पावडर, साखर, दूध यावर कर भरतो. न्याहरी,जेवण बनवले त्या किराणा वस्तूंवर कर, अन्न शिजवण्यासाठी गॅसची हंडी भरून आणली त्यावर कर द्यावा लागतो. भाजीपाला वस्तू खराब न व्हाव्या म्हणून फ्रीज घेतले त्यावर कर,ऑफिस,कामावर जायला दुचाकी घेतली त्यावर कर, त्यात पेट्रोल ओतले त्यावर कर, ऊन वारा पाऊस पासून संरक्षण म्हणून घर घेतले त्यावर कर, नावावर केले त्यावरही कर, गाडी रस्त्यावर चालवली त्यावरही कर,सेकंड हॅन्ड चारचाकी घेतली टोल नाक्यावर कर, चालक परवाना घेतला त्यावरही कर,लज्जा रक्षणासाठी कपडे घेतले त्यावरही कर, अहो एवढेच काय शौचालयात गेले तेथेही कर भरावा लागतो, मोबाईल, टीव्ही घेतला. त्यात रिचार्ज मारला त्यावरही कर, घरात वीज घेतली त्यावरही कर...! अशा शेकडो दैनंदिन वापराच्या, गरजेच्या, मनोरंजनाच्या, जीवनाशक वस्तू, शैक्षणिक वस्तू, दळणवळणाच्या वस्तू कर भरतो. घाईगडबडीने काही चुकले. नियम नाही पाळले तर लाचेच्या रूपात दंडभरावा लागतो तो भ्रष्टांच्या




खिशात जातो. जीवनभर नोकरी केली त्यावरही व्यवसाय कर भरतो. एवढेच नाही तर उत्पन्नाची काही वर्षानंतर कमाल मर्यादा ओलांडली तर त्यावरही हजारो रुपये कर भरतो.

एवढा सारा कर भरून मात्र सुरक्षा नाही, शाळा चांगल्या नाहीत, मुले खाजगी शाळेत टाकायची तर भरमसाठ फी, वैद्यकीय सेवा पुरेशा नाहीत, सार्वजनिक वाहतुकीच्या ठिकाणी वाहतुकीचे साधने व्यवस्थित नाही. रोड रस्ते खराब त्यातून दररोज हजारो अपघात होत आहे व कित्येकांचा बळी जात आहे. सार्वजनिक रस्त्यावरील पथदिवे खराब आहे त्यांची दुरुस्ती नाही. सार्वजनिक नळातून येणारे पाणी खराब आहे त्यासह महागाई झपाट्याने वाढत आहे. त्याचबरोबर जीवनात येणारे अनपेक्षित खर्च, संकटे यावर खूप खर्च होत आहे. सार्वजनिक ठिकाणी सर्व कायद्यांची पायमल्ली होत आहे अशा अनेक घडामोडीतून सकाळपासून संध्याकाळपर्यंत दिवसभरातून एक मध्यमवर्गीय त्यांच्या एकूण कमाईतून जवळपास सर्व छोट्या-मोठ्या गोष्टी, साधने,सुविधा वरील कर लक्षात घेता जवळपास २० ते २५ टक्के भरतो आणि स्वतः साठी ७० ते ७५ टक्के स्वतःसाठी, घरासाठी कुटुंबासाठी उपभोग वस्तूसाठी व काही बचत करतो. त्या बचतीतून स्वतः व कुटुंबासाठी विमा काढतो तर त्यावरही कर भरावा लागतो. याचा आपण कधी बारकाईने विचार केला का?कधीच नाही, कारण, दैनंदिन कामातून आपल्यासारख्या मध्यमवर्गीयांन वेळ भेटतो कुठे?गुणांवर आधारित या शिक्षण व्यवस्थेत शिक्षणही घेतले ते केवळ मार्कासाठी....! अर्थशास्त्र आपल्यापासून कोसो दूर, त्यांचा जणू काही जीवनात कधी संबंधच येणार नाही. मात्र आता सर्वसामान्य मध्यमवर्गीयांना विचार करणे अत्यंत आवश्यक आहे.

संपूर्ण देशभरातून सरकारकडे वेगवेगळ्या क्षेत्रातून करोडो अब्जो रुपये कर स्वरूपात संचित निधी जमा होतो मग हा सगळा पैसा जातो कुठे? भ्रष्टाचारात, निवडणुकीत..! एखाद्या कामासाठी निधी मंजूर होतो तर काही टक्केच त्यावर खर्च केला जातो व बरीच रक्कम भ्रष्टांच्या खिशात जमा होते. उच्च दर्जाचे घर, बंगले, गाड्या खरेदी. मात्र सर्वसामान्यांचे काय? मध्यमवर्गीयांचे काय? एवढा आयुष्यभर शेकडो वस्तूंवर कर भरून हलाखीचे जीवन व दैनी अवस्था कधी लक्षात येईल सामान्य माणसांच्या! आपल्यासारख्या मध्यमवर्गीयांच्या! नक्कीच ! या अतिशय ज्वलंत विषयावर चिंतन व्हायला हवे.

**विनोद शेणफड जाधव,**
**मासरूळ जि. बुलडाणा**
**मो.९७६३२८२०७७**


This letter was written by owner, publisher, editor - Vinod Kailas Gore by Gayatri Traders at Main Road, At.Po.Chikhli, Tq. Chikhli, Dist. Buldana (MS) Pin No.443201 published from Indira Nagar Ward No.27 Buldana (MAHARASHTRA) Pin No.443001.
Editor, Printer and Publisher do not necessarily agree with the text of this letter. Legal disputes in Buldana Court. Email : newsaksharaj2021@gmail.com **Editor : Vinod Kailas Gore Mob.: 8605313202**
हे पत्र मालक, प्रकाशक, संपादक विनोद कैलास गोरे यांनी गायत्री ट्रेडर्स, मेन रोड, मु.पो. चिखली, ता. चिखली, जि. बुलडाणा (म.रा.) पिन क्रमांक ४४३२०१ येथे मुद्रित करून इंदिरा नगर वॉर्ड क्रमांक २७ बुलडाणा पिन क्रमांक ४४३००१ या ठिकाणाहून प्रकाशित केले आहे.
या पत्रात प्रसिद्ध झालेल्या मजकुराबाबत संपादक, मुद्रक, प्रकाशक सहमत असतीलच असे नाही. कायदेशीर वादविवाद बुलडाणा न्यायालयीन कक्षेत. Email : newsaksharaj2021@gmail.com संपादक : विनोद कैलास गोरे मोबा.: ८६०५३१३२०२

# थोडक्यात

## घणसोलीमध्ये वाहतुकीत बदल; वाहतूक निवारणासाठी पर्यायी मार्गाचा वापर करावा - वाहतूक पोलीस

**अक्षराज : महादेव चव्हाण**

**दि.२९, ठाणे (नवी मुंबई) :** घणसोलीमध्ये वाहतुकीत मोठा बदल करण्यात येणार आहे. घणसोली येथील रस्त्याची कामं (Road construction projects) पूर्ण करण्यासाठी पोलिसांनी वाहतुकीत बदल करण्याचा निर्णय घेतला आहे. दिनांक २९ जानेवारी २०२५ पासून पुढील २५ दिवस हा बदल असणार आहे. त्यामुळे नागरिकांनी पुढील काही दिवस पर्यायी रस्त्याचा वापर करावा. असे आवाहन पोलिसांकडून करण्यात आले आहे. नवी मुंबई महानगरपालिकेतर्फे घणसोली विभागात अंतर्गत रस्त्यांची कामे करण्यात येणार आहेत. रस्त्यांच्या कामामुळे वाहतूक पोलिसांनी घणसोलीमधील वाहतूक वळवण्याची घोषणा केली आहे. नवी मुंबई मनपाने या १०० मीटरच्या कामाचे कंत्राट अश्विनी इन्फ्रा डेव्हलपमेंट प्रायव्हेट लिमिटेड या कंपनीला दिले असून २९ जानेवारी पासून या कामानिमित्त रस्ते वाहतूक वळविण्यात येणार आहे.

घणसोली गाव ते घणसोली जंक्शन, सदगुरु हॉस्पिटल ते घणसोली सेक्टर ६ आणि घणसोली शेतकरी शाळा ते सेक्टर ६ मार्गे सदगुरु हॉस्पिटलला जोडणाऱ्या रस्त्यांवर हे काम करण्यात येणार आहे. या कालावधीत घणसोली मीनाताई हॉस्पिटल ते घणसोली जंक्शन हे दोन्ही अंडरपास वाहतुकीसाठी बंद राहणार आहेत. वाहनचालकांना वाहतूक पोलीसांनी काही पर्यायी मार्ग दिलेत यामध्ये घणसोली गाव आणि घणसोली जंक्शन दरम्यान प्रवास करणारी वाहने महादेव मंदिर आणि डी-मार्ट मार्गे घणसोली सेक्टर ६ मार्गे जातील तसेच घणसोली सेक्टर ६ कडे जाणारी वाहतूक सेक्टर १५, १६, १७ आणि १८ मधील डी-मार्ट मार्गे तळवली गाव मार्गे मार्गी जाणार आहेत. घणसोली जंक्शनवरून घणसोली गावात प्रवेश करणाऱ्या वाहनांना नौसिल नाका, तळवली गाव किंवा दत्तनगर मार्गे प्रवेश दिला जाणार आहे. पुढील २५ दिवस रस्ते बांधकामाचे काम सुरु राहणार असून वाहन चालकांनी पर्यायी मार्गांचा अवलंब करण्याचे आवाहन वाहतूक पोलीसांनी केले आहे.

## पारनेरला साकारणार तांबडीकार प्रकल्प आमदार दातेंचा पाठपुरावा



**अक्षराज : वसंत रांधवण**

**दि.२८, पारनेर (अहिल्यानगर) :** तालुक्याच्या उत्तर भागातील शेतकऱ्यांसाठी उपयुक्त ठरणाऱ्या पोखरी वासुंदे येथिल तांबडीकार प्रकल्प जागेची नुकतीच अहिल्यानगर मध्यम प्रकल्प विभागाचे कार्यकारी अभियंता जगदीश पाटील व सहाय्यक कार्यकारी अभियंता अनंत उपाध्ये यांनी पहाणी केली. तांबडीकार प्रकल्प पूर्णत्वास जावा. याबाबत जिल्हा परिषदेचे माजी उपाध्यक्ष सुजित झावरे पाटील यांनी आमदार काशिनाथ दाते यांच्याकडे मागणी केली होती. त्यानंतर आमदार काशिनाथ दाते यांनी जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांच्याकडे या प्रकल्पाच्या मंजुरीची मागणी केली होती. तसेच विधानसभेच्या अधिवेशनात पारनेरच्या पाणी प्रश्नावर आवाज उठविला होता. वासुंदे येथिल २५० दशलक्ष घनफूट क्षमता असलेले धरण मांडओहळ धरण लहान आहे. तथापि या धरणामुळे टाकळी ढोकेश्वर, वासुंदे, वडगाव सावताळ, कर्जुले हार्या, पोखरी परिसर खडकवाडी, शिक्री, पळशी परिसराला उपसा सिंचन योजनेच्या माध्यमातून पाणी उपलब्ध होणार आहे. दरम्यान प्रकल्पाचे ड्रोनच्या माध्यमातून सर्वेक्षण केले जाणार आहे.

## मुलांवर विद्यार्थीदशेतच संस्कार होणे काळाची गरज - व्याख्याते शिंदे




**अक्षराज : आश्रुबा कोठावळे**

**दि.२९, कळंब (धाराशिव) :** शिक्षण महर्षी ज्ञानदेव मोहेकर चॅरिटेबल ट्रस्ट आणि रोटरी क्लब ऑफ कळंब सिटीच्या यांच्या संयुक्त विद्यमाने शिक्षण महर्षी ज्ञानदेव मोहेकर स्मृति व्याख्यान-२०२५ आयोजित करण्यात आली होती. त्याप्रसंगी संस्कार आणि आजची पिढी यावर व्याख्यान देताना गणेश शिंदे म्हणाले, 'शिक्षण ही समाजपरिवर्तनाची पहिली पायरी असते. असे ओळखून पूज्य ज्ञानदेव मोहेकर गुरूजींनी प्रेरित होऊन ज्ञान प्रसारक मंडळ संस्था स्थापन केली. तसेच मुलांनी ध्येय समोर ठेवून अभ्यास करून यशस्वी व्हावे. योग्यवेळी निर्णय घ्यावा लागतो. मोबाईल, इंटरनेट, फेसबुक, इन्स्टाग्राम आणि ट्विटर यांसारख्या गतिमान सामाजिक माध्यमांमुळे ही पिढी कुठेतरी भरकट जाण्याची शक्यता आहे. त्यासाठी आईवडीलांनी मुलांना वेळ काढून त्यांच्याशी वेळोवेळी विचारपूस करून सुसंवाद साधला पाहिजे. खऱ्या अर्थाने आजच्या पिढीवर विद्यार्थी दशेतच भविष्याची जडणघडण उत्तमप्रकारे होऊ शकते.

विज्ञान- तंत्रज्ञानासह संत ज्ञानेश्वर, संत नामदेव, जगद्गुरु तुकाराम, संत गाडगेबाबा आणि छत्रपती शिवाजी महाराज अशा महापुरुषांच्या आदर्श विचार व मूल्यसंस्कार रुजविण्याची नितांत आवश्यकता आहे.

प्रारंभीस संस्थेचे संस्थापक पूज्य ज्ञानदेव मोहेकर गुरुजीं आणि संस्थामाता कै.सुमनबाई मोहेकर यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. विचारपीठावर उद्घाटक डॉ.अशोकराव मोहेकर (सचिव, ज्ञान प्रसारक मंडळ येरमाळा), रो.अध्यक्ष अरविंद शिंदे, रो.प्रॉजेक्ट चेअरमन संजय देवडा यांची उपस्थिती होती. पुढे ते म्हणाले, वर्तमानात दिवसेंदिवस व्यसनाधीनता, नैराश्य यासारख्या सामाजिक समस्या उद्भवत आहेत, अशा परिस्थितीत संस्काराच्या माध्यमातून चांगला समाज निर्माण होऊ शकतो. त्यासाठी असे विचारपीठ असायला पाहिजेत. तसेच त्यांनी विद्यार्थ्यांना काय सांगू राणी मला गांव सुटेना ही भावनिक कविता सादर करून ग्रामीण भागाशी आपल नात टिकवून ठेवण्याचा उपदेश ही दिला. यावेळी प्रा. वसंतराव मडके, प्रा.डॉ.डी.एस.जाधव, प्रा.डॉ.संजय कांबळे, प्रा.पल्लवी उंदरे, प्रा.ए.आर. मुखेडकर, प्रा.अर्चना पाटील, प्रा.अंजली मोहेकर तसेच उपप्राचार्य डॉ.हेमंत भगवान, डॉ.के.डी.जाधव, अप्पासाहेब मिटकरी यांची प्रमुख उपस्थिती होती.

सुशील तीर्थकर, प्रा.डॉ.बाबासाहेब सावंत, सतीश मांडवकर, यावेळी शि.म.ज्ञानदेव मोहेकर ट्रस्ट आणि रोटरीचे क्लबचे सदस्य तसेच जनजागृती शाळा, विद्याभवन हायस्कूल, मॉडेल इंग्लिश स्कूल, ज्ञानोद्योग विद्यालय, मोहा आदी शाळेतील विद्यार्थी, शिक्षक, शहरातील शिक्षण प्रेमी नागरिक, पत्रकार, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी आणि विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. व्याख्यानमालेचे सूत्रसंचालन सांस्कृतिक विभागप्रमुख प्रा.डॉ. दीपक सूर्यवंशी, प्रास्ताविक प्राचार्य डॉ.सुनिल पवार यांनी केले. अतिथीचा परिचय रो. संजय घुले यांनी तर उपस्थितांचे आभार रो.अध्यक्ष अरविंद शिंदे यांनी मानले. व्याख्यानमालेची सांगता सामूहिक राष्ट्रगीताने करण्यात आली.

## गुहागर शहरात इ-कचरा संकलनाचा शुभारंभ; गावागावात होणार संकलन केंद्र



**अक्षराज : उदय दणदणे**

**दि.२८, गुहागर :** गुहागर येथील पोलीस परेड मैदानावर झालेल्या ध्वजारोहण समारंभानंतर गुहागर तालुक्यातील इ कचरा संकलनाच्या अभियानाचा शुभारंभ करण्यात आला. गुहागरचे तहसीलदार परिक्षित पाटील, पोलीस निरीक्षक सचिन सावंत, गटविकास अधिकारी केळस्कर, गुहागर नगरपंचायतचे मुख्य कार्यकारी अधिकारी स्वप्नील चव्हाण आणि लायन्स क्लब ऑफ गुहागर सिटीचे अध्यक्ष अनिकेत गोळे आदींच्या हस्ते इ कचरा नगरपंचायतीच्या घंटागाडीत टाकण्यात आला.

गुहागर न्यूजतर्फे इ कचरा संकलन अभियान राबविण्यात येणार आहे. सध्या शासनाद्वारे शहरी आणि ग्रामीण भागात माझी वसुंधरा अभियान सुरु आहे. त्यातही इ कचरा संकलनाचा विषय असल्याने गुहागरच्या तहसील कार्यालय, पंचायत समिती आणि नगरपंचायतीने या उपक्रमाला आणखी बळ दिले. त्यामुळे आता गुहागर न्यूजच्या इ कचरा संकलनाचे अभियान तालुक्यात होणार आहे. या अभियानामध्ये नादुरुस्त झालेल्या इलेक्ट्रॉनिक्स वस्तू. ज्यामध्ये जुने मोबाईल, टॅब, मोबाईल चार्जर, इयरफोन, पॉवरबँक, लॅपटॉप, कॉम्प्युटर (स्क्रीन, सीपीयु, किबोर्ड, माऊस, मदरबोर्ड, प्रिंटर, टोनर, स्कॅनर, केबल), सर्व प्रकारचे टिव्ही, फ्रीज, वॉशिंग मशीन, म्युझिक सिस्टीम, रेडिओ, कोविड काळात वापरलेले ऑक्समिटर, श्रवणयंत्रे, स्मार्ट वॉच आदी इ कचरा शहरी आणि ग्रामीण भागातून संकलित करण्यात येणार आहे.

या अभियानाचा शुभारंभ प्रजासत्ताक दिनी गुहागरच्या पोलीस परेड मैदानावर झाला. गुहागर शहरात इ कचरा संकलनासाठी फिरविण्यात येणाऱ्या घंटागाडीचा समावेश संचलनात करण्यात आला होता. संचलन झाल्यानंतर ही घंटागाडी मैदानाच्या मध्यभागी उभी करण्यात आली. मयूरेश पाटणकर यांनी यावेळी अभियानाची माहिती उपस्थितांना दिली. त्यानंतर तहसीलदार, पोलीस निरिक्षक, गटविकास अधिकारी, मुख्याधिकारी, लायन्स क्लबचे सदस्य यांनी प्रातिनिधीक स्वरुपात नादुरुस्त इलेक्ट्रॉनिक वस्तू घंटागाडीत टाकल्या. गुहागर नगरपंचायत क्षेत्रात फेब्रुवारी महिन्यातील प्रत्येक रविवारी इ कचरा संकलनासाठी विशेष मोहिम राबविण्यात येणार आहे. गुहागर शहरातील नागरिकांनी आपल्या घरातील दुकानातील कचरा रविवारी घंटा गाडीत द्यावा असे आवाहन मुख्याधिकारी स्वप्नील चव्हाण यांनी केले.

२६जानेवारीपासून १५ फेब्रुवारीपर्यंत सर्व ग्राम पंचायतींमार्फत इ कचरा संकलनाविषयी जनजागृती करण्यात येणार आहे. तसेच गावागावात संकलन केंद्र तयार केली जाणार आहेत. १५ ते २३ फेब्रुवारी या काळात ग्रामीण भागात इ कचरा संकलीत करण्यात येणार आहे. या अभियानाच्या यशस्वीतेसाठी नगरपंचायत कर्मचारी, सरपंच संघटना, ग्रामसेवक संघटना यांचे सहकार्य मिळणार आहे. त्यासाठीचे नियोजन गटविकास अधिकारी केळस्कर करीत आहेत.

शासकीय, निमशासकीय, खासगी संस्थांनी आपल्याकडील इ कचरा कायदेशीर प्रक्रिया पूर्ण करुन या संकलन अभियानात द्यावा. असे आवाहन तहसीलदार परिक्षित पाटील यांनी केले आहे.

## शिळगांव अखंड हरिनाम सप्ताहाची सांगता...



**अक्षराज : विनोद वास्कर**

**दि.२९, शिळफाटा (ठाणे) :** शिळगावातील वेशी आई मदिरा च्या ठिकाणी हरिनाम कीर्तन सोहळ्याला दिनांक २७ जानेवारी २०२५ रोजी पासून सुरूवात झाली. या हरिनाम कीर्तन सोहळ्यासाठी महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यातून वारकरी संप्रदाय, भावीक, भक्त आणि ग्रामस्थ दररोज १ हजार ५०० च्या वर संख्येने उपस्थित राहत होते. पहिल्या दिवशी वेशी आई आणि श्री सत्यनारायणाची महापूजा करण्यात आली.

तीन दिवस दररोज सायंकाळी ७ ते ९ महाराजांचे कीर्तन झाले. भजन, पवचन हरिपाठ, हे सुद्धा झाले. दिनांक २८ जानेवारी २०२५ रोजी सायंकाळी ४ वेशी आई मंदिरापासून दिंडीला सुरुवात झाली. या दिंडीला महिलांनी ज्ञानेश्वरी पारायण, तुळशी वृंदावन डोक्यावर घेऊन हातात टाळ बाळ गोपाळ यांच्यासह भाविक वारकरी ग्रामस्थ शामिल होते.हरिपाठ, टाळ, मृदंगाच्या तालावर महिला पुरुष फुगड्या सुद्धा खेळत होत्या. तसेच नाचत सुद्धा होत्या. असं वाटत होतं शिळगावात पंढरपूर अवतरली असं वाटत होतं. हरिनामाचा गजर होत शिळगाव दुमदुमली. ज्ञानेश्वर माऊली, नामदेव माऊली, हा एकच आवाज कानी पडत होता. पालखी हनुमान मंदिर, पुढे गेल्यानंतर भवानी चौकात रिंगण झाले. त्यानंतर महाकालेश्वर मंदिर, तुळजाभवानी मंदिर, सर्व ठिकाणातून पालखी मिरवणूक काढण्यात आली त्यानंतर गावाला पूर्ण प्रदक्षिणा झाल्यानंतर पुन्हा वेशी आई मंदिराच्या ठिकाणी मोठ्या उत्साहात दिंडीची समाप्ती झाली.

पहिल्या दिवशी सोमवार, दिनांक २७ जानेवारी २०२५ रोजी सायंकाळी ७ ते ९ वाजेपर्यंत ह.भ.प. सुभाष महाराज पाटील (नागोठणे) यांचे कीर्तन झाले. दुसऱ्या दिवशी मंगळवार, दिनांक २८ जानेवारी २०२५ रोजी सायंकाळी ७ ते ९ वाजेपर्यंत ह.भ.प.डॉ.नाना महाराज कदम (बंकट स्वामी संस्थान नेकनूर -बीड) यांचं कीर्तन झाले. तिसऱ्या दिवशी बुधवार, दिनांक २९ जानेवारी २०२५ रोजी सकाळी १० वाजता काल्याचे सुश्राव्य किर्तन ह भ. प. गुरुवर्य साळाराम महाराज यांचे नातू ह.भ. प.चेतन महाराज म्हात्रे ( कोपर डोंबिवली) अध्यक्ष वारकरी सं.प्र.मंडळ ठाणे - रायगड यांचे १२:३० वाजेपर्यंत कीर्तन झाले. खास करून या कालच्या कीर्तना हाशा रामा पाटील माध्यमिक उच्च माध्यमिक विद्यालयाचे (शिळगांव) विद्यार्थी, विद्यार्थ्यांनी, मुख्याध्यापक, शिक्षक सुद्धा उपस्थित होते. श्रीकृष्ण, गणपती, सरस्वती, छत्रपती शिवाजी महाराज, वारकरी असे अनेक रूपधारण करून आणि पोशाख परिधान करून विद्यार्थी कीर्तनाला आले होते. लहान वयातच विद्यार्थ्यांना आपल्या संस्कृती, कला, रुढी, परंपरा देव देवतांची मिळाली तर त्यांच्यावर चांगले सत्कार होतात. कीर्तनाची समाप्ती झाल्यानंतर दहीहंडी कार्यक्रम झाला.

आलेल्या सर्व वारकरी संप्रदाय, भावीक भक्त विद्यार्थी यांना मानव सेवा प्रतिष्ठान कडून १ हजार ५०० पेन वाटण्यात आले. यानंतर या भव्य अखंड हरिनाम सप्ताहाची महाप्रसाद महापंगत बसवण्यात आली. तब्बल तीन दिवस रात्रविना पूजा अर्चना सेवा अखंडित चालू होती. या अखंड हरिनाम सप्ताहाची सांगता सोहळ्याप्रसंगी शिळगांव कल्याण फाटा भोलेनाथ नगर, शिळठाकूर पाडा सह फडकेपाडा, खार्डी, कौसा, डायघर, उत्तरशिव, देसाई, मोठी देसाई, पडले, खिडकाळी, भंडार,ली मोकाशी पाडा, दहिसर, दहिसर मोरी, पिंपरी, नेवाळी, नागांव, वाकळण, बामाली, निघू, नारिवली, घेसर, निळजे, कोळे, काटई, हेदुटणे, खोणी, मानपाडा, संदप, बेतवडे, दातिवली, म्हाताडी, आगासन, दिवा, साबे व सामुदायिक हरिपाठ मंडळ २६ गावेकर एकादशी ग्रुप, सह परिसरातील विविध गाव वाड्या वस्त्यांमधून वारकरी संप्रदाय ग्रामस्थ भाविक भक्त मोठ्या संख्येने उपस्थित होते. अशा चरणी तीन दिवस मोठ्या उत्साहात हरिनाम कीर्तन सोहळा शिळगावात साजरा झाला.

## खो-खो मध्ये महाराष्ट्राच्या दोन्ही संघांची घोडदौड!

### पुरूषांचा केरळवर तर महिलांचा पश्चिम बंगालवर विजय...



**अक्षराज : प्रतिनिधी**

**दि.२९, उत्तराखंड :** गतविजेत्या महाराष्ट्राच्या पुरूष व महिला या दोन्ही खो-खो संघांनी ३८व्या राष्ट्रीय क्रीडा स्पर्धेतील आपली विजयी घोडदौड अपेक्षेप्रमाणे सुरूच ठेवली आहे . महाराष्ट्राच्या पुरूष संघाने केरळाचा तर महिला संघाने पश्चिम बंगालचा पराभव करीत गटात अव्वल कामगिरी केली.

पुरूषांच्या सामन्यात महाराष्ट्र संघाने केरळवर ११ गुणांनी (४७-३६) मात केली. मध्यंतराला महाराष्ट्राकडे १० गुणांची (२४-१४) आघाडी होती. महाराष्ट्राकडून कर्णधार गजानन शेंगाळ (१.३० मि., २ मि. संरक्षण आणि २ गुण), राहूल मंडल (१.३० मि. संरक्षण व १० गुण), रामजी कश्यप (१.१० मि., १.४० मि. संरक्षण व ८ गुण), शुभम थोरात (१.४० मि., १.२५ मि. आणि २ गुण) यांनी विजयात मोलाचा वाटा उचलला. पराभूत झालेल्या केरळकडून निखिल बी (१.१० मि. संरक्षण व १० गुण), देवनारायण (१ मि. संरक्षण व गुण) यांनी दिलेली झुंज अपयशी ठरली.

महिलांची दमदार कामगिरी महिला गटातील सामन्यात महाराष्ट्र संघाने पश्चिम बंगालचा एक डाव व ४ गुणांनी (२४-२०) धुव्वा उडविला. या एकतर्फी विजयात प्रियांका इंगळे (२.१५ मि., नाबाद १.५० मि. आणि ६ गुण), संपदा मोरे (१.३० मि. संरक्षण आणि ६ गुण) यांनी अष्टपैलू खेळ केला. याचबरोबर पायल पवार (१.४० मिनिटे संरक्षण), संध्या सुरवसे (२.५५ मि. व १.२५ मि. संरक्षण आणि २ गुण) यांनीही दमदार कामगिरी केली. पश्चिम बंगालकडून इशिता विश्वास (१.२० मि. संरक्षण व ४ गुण), दिपिका चौधरी (१.१० मि. संरक्षण आणि ४ गुण) यांनी चांगली लढत देण्याचा प्रयत्न केला.

## 'पाल' देवस्थानला पर्यटन स्थळासाठी प्रस्ताव सादर करावा - पर्यटन मंत्री

**अक्षराज : जे.के.पोळ**

**दि.२९, ठाणे :** कराड तालुक्यातील पाल देवस्थान 'ब' वर्गाचे देवस्थान आहे. या देवस्थानाला येणाऱ्या पर्यटकांची संख्या मोठ्या प्रमाणात असून पर्यटकांना सोई-सुविधा उपलब्ध करुन देण्यासाठी 'पाल' देवस्थानाचा विकास पर्यटनाच्या माध्यमातून करणे आवश्यक आहे. या पार्श्वभूमीवर पाल देवस्थानाला पर्यटन स्थळ घोषित करण्यासंदर्भात सातारा जिल्हाधिकारी कार्यालयाने सविस्तर प्रस्ताव सादर करावा, असे निर्देश पर्यटन, खनिकर्म, माजी सैनिक कल्याण मंत्री शंभूराज देसाई यांनी दिले.

मंत्रालयात पाल (ता.कराड) येथील 'ब' वर्ग देवस्थान येथे भाविक व पर्यटकांना सोई-सुविधा उपलब्ध करुन देण्यासाठी एकात्मिक धार्मिक पर्यटन विकास आराखडा तयार करण्याबाबत व 'पर्यटन पोलीस' या विषयासंदर्भात आढावा बैठक झाली. यावेळी उत्तर कराडचे आमदार मनोज घोरपडे, पर्यटन विभागाचे प्रधान सचिव अतुल पाटणे, महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळाचे व्यवस्थापकीय संचालक मनोजकुमार सुर्यवंशी, पर्यटन विभागाचे उपसचिव पवार, पर्यटन संचालनालयाचे संचालक बी.एन पाटील, महाराष्ट्र राज्य सुरक्षा मंडळाचे राहुल श्रीरामे, मेस्कोच्या व्यवस्थापकीय संचालक वर्षा लड्डा उपस्थित होते.

पर्यटन मंत्री देसाई म्हणाले की, 'पाल' ला पर्यटन स्थळाचा दर्जा देण्यासाठी सर्व तांत्रिक बाबींचा विचार करुन परिपूर्ण प्रस्ताव एक महिन्याच्या आत सादर करावा. तसेच पर्यटनासाठी शासकीय जागेस प्राधान्य देण्यात यावे, अशी सूचनाही त्यांनी यावेळी केली.

### पर्यटकांच्या सेवेसाठी 'पर्यटन पोलीस'

राज्यात येणाऱ्या पर्यटकांच्या मनात सुरक्षिततेची भावना निर्माण व्हावी. तसेच राज्यातील संस्कृती, इतिहास, पर्यटनस्थळे, कायदा, नियम, पर्यटनाविषयी आवश्यक माहिती देण्यासाठी राज्यात पर्यटन स्थळावर पर्यटकांच्या सेवेसाठी पर्यटन पोलीसांची कंत्राटी तत्वावर नियुक्ती करण्यात येणार आहे, असे पर्यटन मंत्री देसाई यांनी सांगितले.

# आ.आवताडेंच्या पाठपुराव्याने अहिल्या पुलास समांतर होणार नवीन पूल

## केंद्रीय सडक मंत्री नितीन गडकरी यांनी मंजूर केला ७७ कोटींचा निधी

**अक्षराज : विकास सरवळे**

**दि.२९, पंढरपूर :** पंढरपूर आणि टेम्भूर्णी मार्गावर भीमा नदीवर आणखी एक पूल होणार असून येथील अहिल्या पुलास समांतर अशा नवीन पुलासाठी केंद्रीय सडक आणि परिवहन मंत्री नितीन गडकरी यांनी ७७ कोटी रुपयांचा निधी मंजूर केल्याची माहिती आ.समाधान आवताडे यांनी दिली. या पुलासाठी आ.आवताडे यांनी ना.गडकरी यांच्याकडे सातत्याने पाठपुरावा केला होता.



पंढरपूर शहरात येणाऱ्या वाहनांची संख्या दरदिवशी वाढत आहे. मात्र भीमा नदीवर पंढरपूर जवळ सध्या एकच नवीन पूल आहे आणि टेम्भूर्णी मार्गावर असलेला अहिल्या पूल ४५ वर्षे जुना आहे. त्यामुळे हा पूल वाहतुकीसाठी धोकादायक ठरतो आहे. दरवर्षी भीमा नदीला पूर आला कि हा पूल पाण्याखाली जातो आणि वाहतूक ठप्प होते. शिवाय अहिल्या पूल जुना असल्याने त्यावरून वाहतूक करणे धोकादायक ठरते आहे. आजवर अनेक वाहने या पुलावरून भीमा नदीमध्ये पडलेली आहेत. या पार्श्वभूमीवर अहिल्या पुलाजवळ आणखी एका समांतर पुलाची गरज होती. आणि आ.समाधान आवताडे यांनी या पुलाची मागणी केली होती. त्या नवीन पुलासाठी केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांनी ७७.७१ कोटी रुपयाचा निधी मंजूर केला आहे. एन एच ५६१ ए या टेम्भूर्णी - पंढरपूर - मंगळवेढा या मार्गावर हा पूल होणार असून दिनांक २७ जानेवारी २०२५ रोजी या पुलाच्या कामास ना.गडकरी यांनी मंजुरी दिली आहे. या पुलाच्या तांत्रिक मान्यतेनंतर २०२७ अखेर पुलाचे काम पूर्ण करण्याचे उद्दिष्ट देण्यात आलेले आहे.

आमदार समाधान आवताडे यांनी पंढरपूर शहर आणि मतदार संघातील विकासासाठी, जास्तीत जास्त निधी उपलब्ध करून घेतला आहे. यामुळेच या मतदारसंघातील मतदारांनी त्यांना पुन्हा एकदा सेवा करण्याची संधी प्राप्त करून दिली आहे. पंढरपूर मंगळवेढा मतदारसंघात काम करत असताना, विविध भागात अनेक प्रकारच्या विकास कामाचा निधी पोहोचविला आहे.

त्याच धर्तीवर आणखी एक नव्याने पूल करण्याची मागणी केली असता. हा निधी मंजूर करून पंढरपूरकरासाठी आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे. आमदार समाधान आवताडे यांनी तरुणांच्या हाताला काम लवकरात लवकर मिळावे. यासाठी ही एम.आय.डी.सी.ची लवकर निर्मिती होण्याच्या दृष्टीने पावले उचलली आहेत. पंढरपूर शहरातील अनेक विकास कामामुळे आमदार समाधान आवताडे यांच्या कामाची मोठी ओळख निर्माण झाली आहे.

# थोडक्यात

## रस्ता सुरक्षा अभियान २०२५ अंतर्गत प्रबोधन कार्यक्रमाला पांडुरंग विद्यालयात उत्स्फूर्त प्रतिसाद

**अक्षराज : भानुदास गायकवाड**

**दि.२८, डोंबिवली (ठाणे) :** डोंबिवली पूर्वेतील पांडुरंग विद्यालयात 'रस्ता सुरक्षा अभियान २०२५' अंतर्गत दिनांक २८ जानेवारी २०२५ रोजी रस्ता सुरक्षा प्रबोधन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. या उपक्रमाला ५५० विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. कार्यक्रमात सेफ्टी वेल्फेअर असोसिएशनचे संस्थापक व अध्यक्ष विशाल शेठे यांनी उपस्थित विद्यार्थ्यांना रस्ता सुरक्षा नियमांचे पालन आणि अपघात टाळण्यासाठी घ्यावयाच्या दक्षता उपायांबद्दल मार्गदर्शन केले. विद्यार्थ्यांना रस्त्यावरील सुरक्षेचे महत्त्व समजावून देण्यात आले. तसेच, ठाणे शहर पोलीस आयुक्तालयाच्या वाहतूक विभागातर्फे पथनाट्य सादर करण्यात आले. या पथनाट्यातून रस्ता अपघातांचे गांभीर्य व सुरक्षित वर्तनाचे महत्व प्रभावीपणे दाखवले गेले. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी वाहतूक उपशाखा डोंबिवलीचे सहाय्यक पोलीस निरीक्षक श्रीराम पाटील, विद्यालयाचे मुख्याध्यापक माचंदुलाल बिराडे तसेच विद्यालयातील सर्व शिक्षक व शिक्षिका उपस्थित होते. कार्यक्रमातून विद्यार्थ्यांना रस्ता सुरक्षा नियमांची माहिती देण्याबरोबरच त्यांच्यात जनजागृतीही झाली. या उपक्रमामुळे रस्ता सुरक्षा या विषयाला अधिक प्राधान्य देण्याची गरज अधोरेखित झाली.

# दूषित पाणी, शिळ्या अन्नामुळे 'जीबीएस' धोका, नागरीकांनी घ्यावी काळजी

**अक्षराज : जे.के.पोळ**

**दि.२९, पनवेल :** पुणे व इतरत्र गुइलेन-बॅरे सिंड्रोम (जीबीएस) या नव्या दुर्मिळ आजाराचे संशयित रुग्ण आढळून येत आहे. दूषित पाणी व शिळ्या अन्नातून जंतू पोटात जातात आणि ते आपल्या पेशींवर हल्ला करून त्या निकामी करतात. त्यामुळे जीबीएसचा धोका निर्माण होतो असे तज्ज्ञांचे मत आहे. या पार्श्वभूमीवर पनवेल महानगरपालिका हद्दीतील नागरिकांनी काळजी घ्यावी असे आवाहन आयुक्त मंगेश चितळे यांनी केले आहे.

**गुइलेन-बॅरे सिंड्रोमची लक्षणे :** या रुग्णांना तीव्र स्वरूपाचे जुलाब, ताप, अंगदुखी अशी लक्षणे सुरुवातीला निर्माण झाली आणि त्यानंतर पायामधील ताकद कमी होणे अशी लक्षणे दिसू लागतात. काही रुग्णांमध्ये अल्प कालावधीमध्ये स्नायूंमधील ताकद कमी होत जाऊन श्वसनाला अडथळा निर्माण व्हायला लागल्याने कृत्रिम श्वसनासाठी त्यांना आयसीयु मध्ये ॲडमिट करावे लागते. हा गिलियन बॅरी सिंड्रोम या आजाराचा शोध फ्रेंच न्यूरोलॉजिस्ट जॉर्ज गिलीयन आणि जीन अलेक्झेडर बॅरी आणि यांनी १९१६ साली लावला म्हणून त्यांच्या नावामुळे या आजाराचे नाव गिलियन बॅरी सिंड्रोम असे पडले.




हा काही नवीन आजार नाही, भारतामध्ये या आजाराच्या केसेस आढळत असतात. या आजारामध्ये माणसाची स्वतः चीच प्रतिकारशक्ती स्वतःच्या मज्जा संस्थेवरती हल्ला चढवते. शरीरातील नसा आणि स्नायू याचे कार्य त्यामुळे बाधित होते. एकुणच या रोगाची लक्षणे लक्षात घेता पनवेल महानगरपालिका हद्दीतील नागरिकांनी जेवणापूर्वी व शौचास जाऊन आल्यानंतर हात साबणाने स्वच्छ धुणे, पुर्ण शिजवेले, ताजे अन्न खावे, रस्त्यांवरील उघडे अन्नपदार्थ खावू नये. ज्या ठिकाणी स्वच्छता पाळली जात नाही.

अशा हॉटेल इतर ठिकाणी खाणे, पाणी पिणे टाळावे. गिलियन बॅरी सिंड्रोम रोगाची लक्षणे दिसू लागल्यास नजिकच्या नागरी प्राथमिक आरोग्य केंद्राशी संपर्क साधावा. असे आवाहन मुख्य वैद्यकिय आरोग्य अधिकारी डॉ.आनंद गोसावी केले आहे.

# कुडपण खुर्द येथे अखंड हरिनाम सप्ताहाचे आयोजन

**अक्षराज : प्रतिनिधी**




**दि.२९, रायगड (पोलादपूर)** : थंड हवेचे ठिकाण म्हणून पर्यटन साठी प्रसिध्द असलेल्या पोलादपूर तालुक्यातील कुडपण खुर्द येथे तपोनिधी गणेशनाथ महाराज यांच्या प्रेरणेने व सदगुरु अरविंदनाथ महाराज यांच्या मार्गदर्शनाखाली अनेक वर्षे अखंड हरिनाम सप्ताहाचे आयोजन करण्यात येते. त्याच अनुषंगाने दिनांक ६ फेब्रुवारी ते ९ फेब्रुवारी २०२५ या कालावधीत संपन्न होणार आहे.यामध्ये काकडा आरती, पारायण, हरिपाठ, किर्तन, जागर तसेच महिलांसाठी हळदी कुंकू तसेच विविध सांस्कृतिक कार्यक्रम तसेच आध्यात्मिक उपक्रम ग्राम स्थांच्या वतीने राबविण्यात येणार आहेत. याचबरोबर स्वराज्याचे प्रमुख सरदार सुभेदार कोंडाजी रायाची शेलार (शेलार मामा) यांची ३५५ वी पुण्यतिथी समाधी सोहळा जन्मगाव कुडपण खुर्द येथे साजरी होणार आहे समाधी सोहळा पुजा तसेच अभिषेक सदगुरु अरविंदनाथ महाराज यांच्या शुभहस्ते करण्यात येनार आहे ह्या कार्यक्रम प्रंसगी प्रमुख उपस्थिती महाराष्ट्र राज्य कॅबिनेट मंत्री भरत गोगावले महाड पोलादपुर आमदार (मंत्री फलोत्पादन / रोजगार हमी योजना / खारभुमी विकास महाराष्ट्र राज्य) हे उपस्थित राहणार आहेत. तसेच अदितीताई तटकरे, कॅबिनेट - मंत्री महिला आणि बालविकास) आमदार प्रविण दरेकर अध्यक्ष मुंबई बँक, महाडच्या माजी नगराध्यक्षा स्नेहल माणिक जगताप, रा.जि.प सदस्य चंद्रकांत कळंबे तसेच विविध राजकीय, सामाजिक, समाजसेवक तसेच पत्रकार, भाविक भक्त, शिवभक्त ह्या अखंड हरिनाम सप्ताहमध्ये भेट देणार आसल्याचे हरिनाम सप्ताहाचे आयोजक कुडपण खुर्द ग्रामस्थांनी सांगितले.

# एस.एन.डी.टी महिला विद्यापीठात आयोजित दोन दिवसीय कार्यशाळा संपन्न

**अक्षराज : प्रतिनिधी**

**दि.२७, मुंबई :** एस.एन.डी.टी महिला विद्यापीठ, मुंबईचे रिसर्च सेंटर फॉर वुमेन्स स्टडीज (ठउथड) आणि भारतीय ज्ञान, संस्कृत आणि योग केंद्र, विद्यापीठ अनुदान आयोग (णऋड), नवी दिल्ली यांच्या संयुक्त विद्यमाने नुकतेच नगर स्वराज मंच आणि मुंबई सिटिझन फोरम २०२५ जुहू कॅम्पसमध्ये दोन दिवसीय कार्यशाळाचे आयोजन करण्यात आले होते.



या कार्यशाळेचा उद्देश संवाद भेट आमचे शहर आमची ओळख स्त्रीवादी दृष्टीकोन – तळागाळातील नेतृत्व वाढविण्यासाठी तंत्रज्ञानाचा वापर ही कार्यशाळा महिला अभ्यास केंद्राच्या सुवर्णमहोत्सवी वर्षभरात आयोजित केलेल्या कार्यक्रमांचा एक भाग होता. सामुदायिक सहयोग, तंत्रज्ञान आणि शहरांमधील तळागाळातील महिला नेतृत्व हे त्याचे लक्ष सहकार्यात्मक कृती संशोधनाद्वारे राबविलेला हा अशा प्रकारचा अनोखा प्रयोग डॉ.वत्सला शुक्ला आणि नगर स्वराज फोरमच्या संयोजक वर्षा विद्या विलास यांनी केला.

या कार्यशाळेचे उद्घाटन विद्यापीठाचे कुलगुरू प्रा.रुबी ओझा यांनी केले. यांनी आपल्या अध्यक्षीय भाषणामध्ये म्हणाल्या, कम्युनिटी कनेक्ट हा नवीन शैक्षणिक धोरण २०२० चा एक महत्त्वाचा घटक आहे आणि विकसित भारत २०४७ चे उद्दिष्ट आज आपल्या समोर आहे.

महिलांच्या माध्यमातून आपल्याला मिळालेले अनमोल ज्ञान हा आपल्या साठी ऐतिहासिक क्षण आहे. भारताच्या ७४ व्या घटनादुरुस्ती आणि नगर राज बिल कायद्याचे शहरी स्थानिक प्रशासनासाठी मैलाचा दगड म्हणून वर्णन केले आणि असा मजबूत आणि अद्वितीय कायदा जगात कोठेही अस्तित्वात नाही यावर भर दिला. कार्यशाळेत राज्यघटनेच्या १२ व्या परिशिष्टात नमूद केलेल्या विविध मुद्द्यांवर शहरांच्या विकास आणि समस्यांवर डॉ. शुक्ला यांनी आपल्या प्रस्तावना मांडले. मुंबई सिटीझन फोरमचे विश्वस्त डॉ.केदार दिवाण म्हणाले की, शहरांना अधिक चांगले न्याय्य आणि टिकाऊ बनवण्यासाठी आज तंत्रज्ञानाशी जोडले जाणे अत्यंत आवश्यक आहे. नगर स्वराज फोरमचे अमोल म्हणाले की, जेव्हा महिला नेतृत्व सक्षम होते. तेव्हा जबाबदारी निर्माण होते आणि शिक्षण आणि आरोग्य सुधारते.

या संशोधनात सामर्थ्य शाली सामाजिक कार्यकर्त्या आणि क्षेत्र सल्लागार श्रीमती वर्षा विलास यांनी महानगर पालिकेत लोकसहभाग नगर राज बिल ३ जुले २००९ पारित लागू करण्याची आणि मुंबईच्या सर्व २४ महानगर वॉर्डां मध्ये क्षेत्र सभा स्थापन करण्याची गरज आहे त्या साठी येनाऱ्या काळात या ३० महिला मुंबईत याचा प्रत्यक्ष प्रयोग करतील हे सांगितले.

भारतीय ज्ञान विज्ञान योग केंद्राचे संचालक डॉ. जितेंद्र तिवारी यांनी स्त्री शक्ती आणि स्त्री नेतृत्व या शब्दाच्या विविध अर्थांवर सखोल चर्चा केली. प्रा.प्रभा तिरमारे यांनी महिलांची सामाजिक व्यावहारिक आणि आर्थिक स्थिती आणि त्यांच्या दैनंदिन आव्हानांमध्ये शिक्षण, ज्ञान आणि नेतृत्वाची भूमिका आणि योगदान यावर चर्चा केली.

या दोन दिवसीय कार्यशाळेत सुमारे ५० महिला कार्यकर्त्या यांनी सहभाग घेतला होता. या महिला कार्यकर्त्या संकल्प संस्था, जनजागृती विद्याथी संघ, आदर्श फाउंडेशन, स्पर्श या संस्थानी विभागात क्षेत्र सभा यांच्या माध्यमातून तळागाळात काम करणाऱ्या महिला कार्यकर्त्यांचा सहभागी करून वस्ती मधील स्थानिक समस्या शोधून हे कसे सोडू शकते.

याचे प्रशिक्षण घेतले. तसेच महत्वाचे योगदान म्हणून संकल्प संस्थांचे अध्यक्ष विनोद हिवाळे, जनजागृती विद्यार्थी संघाचे सचिव संतोष सुर्वे, आदर्श फाउंडेशनच्या अध्यक्ष सुजाता सावंत, स्पर्श च्या सारिका देसाई, स्वयम् मां फाउंडेशन च्या सुरेखा पेडणेकर यांना संबंधित चिन्ह देऊन गौरवण्यात आले.

# वाकवली शाळेला टीव्ही संच व साऊंड सिस्टिम भेट



**अक्षराज : उमेश तबिब**

**दि.२७, रत्नागिरी :** मंडणगड तालुक्यातील वाकवली येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेला श्री.बालाजी डेव्हलपर्स पुणे चे सर्वेसर्वा व पुणे येथील उद्योजक विकास बेंगडे पाटील यांनी टीव्ही संच व साऊंड सिस्टिम भेट दिली. वाकवली गावचे सरपंच गणेश पेंढारे, शिक्षण कमिटी अध्यक्ष दिलीप धोंडगे, पोलीस पाटील मंगेश केंद्रे, गावातील आदर्श शिक्षक सचिन अबगुल व इतर ग्रामस्थ यांनी बेंगडे पाटील यांचेकडे आमच्या गावातील शाळेतील विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी आपल्या उद्योग संस्थेकडून टीव्ही संच आणि साऊंड सिस्टिमची मदत करता आली तर आमच्या मुलांना त्याचा नक्कीच फायदा होईल. अशी मागणी केली असता बेंगडे पाटील यांनी तात्काळ वरील साहित्य उपलब्ध करून दिले. त्यामुळे गावातील सर्व नागरिक व शाळेतील विद्यार्थी यांच्यामध्ये आनंदाचे वातावरण निर्माण झाले. बेंगडे पाटील यांचे सामाजिक शैक्षणिक क्षेत्रात नेहमीच योगदान असते. त्यांच्याकडून पंचक्रोशीतील उमेद फाउंडेशनला पावसाळी सीझनमध्ये रेनकोट भेट देण्यात आले होते. तसेच शेनाळे येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेतील विद्यार्थ्यांसाठी कलर प्रिंटर व यावर्षी राबविण्यात आलेल्या क्रीडा महोत्सवातील विजेत्या विद्यार्थ्यांना सन्मान चिन्ह स्वरूपातील ट्रॉफींचे सौजन्य विकास बेंगडे पाटील यांच्याकडून देण्यात आले होते. महामाता रमाई आंबेडकर यांचे जयंती निमित्त ६ व ७ फेब्रुवारी रोजी अभिवादन करण्यासाठी येणार्या नागरिकांची मंडनगड येथे चहा - नाश्त्याची व विश्रांतीची सोय व्हावी. म्हणुन काम करणार्या नगरसेवक आदेशभाऊ मर्चंडे यांच्या कार्याला रोख रु. ११००० देणगी दिली. तसेच वाकवली येथे अनेक ग्रामस्थांच्या उपस्थितीत वरील साहित्य प्रदान करत असताना बालाजी डेव्हलपर्सचे व्यवस्थापक अनिल सावंत व अमोल शिंदे यांनी गावातील ग्रामस्थ व विद्यार्थी यांच्या उपस्थितीत वरील साहित्य भेट स्वरूपात दिले. त्यावेळी गावचे सरपंच गणेश पेंढारे, पोलीस पाटील मंगेश केंद्रे, शिक्षण कमिटीचे अध्यक्ष दिलीप धोंडगे,सुभाष शिनगारे, स्वप्निल शिनगारे, ज्येष्ठ नागरिक अनंत शिनगारे, आदर्श शिक्षक सचिन अबगुल, मालुसरे, कृष्णा कदम, मारुती घडवले, जगन्नाथ शिनगारे, सत्यवान भुवड, मारुती शिनगारे, विजय पवार, उमेश जाधव, विजय पावसकर, संदेश पेंढारे, नथुराम धोंडगे, रमेश जाधव व संतोष शिनगारे इत्यादी उपस्थित होते. वाकवली शाळेचे शिक्षक मालुसरे यांनी प्रस्ताविक करून आपले मनोगत व्यक्त केले. श्री बालाजी डेव्हलपर्स च्या वतीने व्यवस्थापक अनिल सावंत यांनी त्यांचे मनोगत व्यक्त केले. सरपंच गणेश पेंढारे यांनी आभार मानले.

# अतिट झेडपी शाळेत ७६ वा प्रजासत्ताक दिन उत्साहात संपन्न

**अक्षराज : बाळू धायगुडे**

**दि.२७, खंडाळा (सातारा) :** अतिट जिल्हा परिषद प्राथमिक शाळा अतिट येथील ७६वा प्रजासत्ताक दिन कार्यक्रम चंद्रकांत जाधव अध्यक्ष शालेय व्यवस्थापन समिती, चंद्रकांत यादव सदस्य पंचायत समिती खंडाळा, शारदाताई जाधव जिल्हा संघटक शिवसेना, रूपाली जाधव सरपंच अतीट आदी मान्यवरांचे उपस्थितीत पार पडला. यावेळी बक्षीस पात्र विद्यार्थ्यांना मान्यवरांचे हस्ते बक्षीस वाटप करण्यात आले. कबड्डी जिल्हास्तर तृतीय क्रमांक समूहगीत तालुकास्तर प्रथम पोवाडा तालुकास्तर द्वितीय, ४०० मीटर धावणे प्रथम, ६०० मीटर धावणे द्वितीय, गोळा फेक मुले तालुका द्वितीय, मुली द्वितीय आदी विध्यार्थ्यांना मान्यवरांचे हस्ते बक्षीस वितरण करण्यात आले. यावेळी शाळेस शैक्षणिक मदत करणाऱ्या मान्यवरांचा सत्कार करण्यात आला. यामध्ये दत्तात्रेय जाधव, विद्युत पंप, सिद्धार्थ कदम विंग ५१ स्पोर्ट ड्रेस, चंद्रकांत जाधव - भौतिक सुविधा, अंकुश जाधव - खोल्यांचा रंग, अंकुश जाधव - प्लंबिंग व वॉटरप्रूफिंग, समस्त रवळेकर परिवार गीत मंचास मदत, भानुदास जाधव - ट्रान्सपोर्ट सुविधा, कैलास गायकवाड - सावता नगर नागर देवळे लोखंडी कपाट, विठ्ठल नेवसे नायगाव विद्यार्थ्यांना



मोफत भोजन तसेच सहली दरम्यान मैत्री फाउंडेशन अतीट विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य वाटप, माजी अध्यक्ष शालेय व्यवस्थापन समिती अतीट शैक्षणिक मदत विशेष सहकार्य लाभले. यावेळी चंद्रकांत यादव माजी सदस्य पंचायत समिती खंडाळा यांचेकडून शाळेसाठी रुपये ५१ हजार मदत जाहीर करण्यात आली. यावेळी पर्वती कानडे मुख्याध्यापक जिल्हा परिषद शाळा अतिट, उपशिक्षक विजय तुपे, नवनाथ काशीद, ज्ञानेश्वर पवार, कोमल गायकवाड, तेजस्वी रवळेकर, कु.कल्याणी जाधव, माजी सरपंच निवृत्ती जाधव ,चंद्रकांत पाटील, उपसरपंच गणेश मांढरे आदीची उपस्थिती होती.